नवराष्ट्र

### 2023-24 च्या 1036 कोटींच्या खर्चासही मंजुरी; निधीची अडचण नाही - देवेंद्र फडणवीस

# जिल्हा वार्षिक नियोजन 1296 कोटींचे

नागपूर, ब्युरो रिपोर्टर. जिल्ह्याच्या विकासासाठी 2023-24 या आर्थिक वर्षातील 1036 कोटी रुपयांच्या खर्चास डीपीसी बैठकीत मान्यता देण्यात आली. तर. चालू आर्थिक वर्ष 2024-25 साठी सुमारे 1296 कोटींचे नियोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सदर येथील नव्या नियोजन भवनात ही बैठक पार पडली. सर्व विभागप्रमुखांना निधी वेळेत खर्च करण्याच्या सूचना यावेळी फडणवीस यांनी दिल्या.

नागपूर जिल्ह्यातील प्रशासकीय इमारतींच्या वैभवात भर घालणाऱ्या जिल्हा नियोजन सभागृहाच्या लोकार्पणानंतर या नूतन सभागृहात जिल्हा वार्षिक नियोजनाची पहिली बैठक पार पडली. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दटके, अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, परिणय फुके, कृपाल तुमाने, अनिल देशमुख, नितीन राऊत, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, मोहन मते, समीर मेघे, अॅड. आशिष जायस्वाल, टेकचंद सावरकर, जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकड्डे, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त चौधरी, जिल्हाधिकारी इटनकर, जिपच्या सीईओ सौम्या शर्मा यांच्यासह विशेष निमंत्रित व नामनिर्देशित सदस्य यांच्यासह संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेचे विभागप्रमुख उपस्थित होते.

बैठकीत नागपूर महानगरातील व इतर भागांमध्ये नदी-नाल्यांवर अतिक्रमण करुन पाण्याचा प्रवाह रोखणाऱ्या भूखंड माफियांचा योग्य तो प्रतिबंध करावा, अशी मागणी आमदार कृष्णा खोपडे, विकास कुंभारे यांनी केली.

आमदार परिणय फुके व आमदार प्रवीण दटके यांनी रस्त्यांच्या कामांमुळे वाहतूक कोंडी व पर्यायी वाहतूक व्यवस्थेबाबत लक्ष वेधले. आमदार डॉ. नितीन राऊत यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे योग्य सर्व्हेक्षण व्हावे अशी मागणी करुन नागरी सुविधाबाबत लक्ष वेधले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे संचालन जिल्हा नियोजन अधिकारी राजेश गायकवाड यांनी केले.




'आजवर आपण चांगला निधी जिल्हा सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी घटक कार्यक्रम यासाठी उपलब्ध करुन दिला आहे. जिल्ह्यातील सर्व मतदार संघात चांगले काम झाले पाहिजे. आपल्याकडे निधीच्या सुयोग्य वापरासाठी समन्वय, सुसूत्रता व काटेकोर नियोजन अधिक प्रभावी झाले पाहिजे.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री, नागपूर जिल्हा**

## समान निधी दिला पाहिजे

जिल्ह्यात डीपीसीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळाला असून पांदण रस्त्यांची कामे असल्याचा मुद्दा सत्ताधारी सदस्यांनी उपस्थित केला. खासदार श्याम बर्वे, आमदार अभिजीत वंजारी, नितीन राऊत, अनिल देशमुख यांनी सर्वच आमदारांच्या क्षेत्रात समान निधी दिला पाहिजे, अशी मागणी केली. त्यावर भाजपा आमदार कृष्णा खोपडे यांनी मविआच्या काळात 'राऊत पालकमंत्री असताना भाजपा सदस्यांच्या क्षेत्रात निधीच दिला नाही' असा आरोप केला. टेकचंद सावरकर यांनीही हाच मुद्दा रेटला. त्यावरून सत्ताधारी व विरोधात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले.

- 2024-25 साठी आतापर्यंत प्राप्त निधी - 407 कोटी
- जुलैअखेर विविध विभागांना वितरीत - 48.72 कोटी
- आतापर्यंत खर्च- 23.71 कोटी

**असे झाले मागील व नवे नियोजन (आकडे कोटीत)**

| शीर्षक | वर्ष 2023-24 | वर्ष 2024-25 |
|---|---|---|
| एकूण नियोजन | 1036 | 1296 |
| सर्वसाधारण योजना | 800 | 944 |
| अनुसूचित जाती उपयोजना | 183 | 195 |
| आदिवासी घटक कार्यक्रम | 53 | 80 |

Orange City Plus Edition
Aug 3, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com